सदाशिव अनंत शुक्लकृत.

खास यशवंत संगीत मंडळीकरितां लिहिलेलें,

# शापित सिंहासन

विविधरसवैचित्र्यानें व दणदणीत मार्मिक प्रसंगानीं नटविलेलें नवें नाटक

लवकरच रंगभूमीवर येईल.

---

# राजाभाई टॉवर

लेखक—सदाशिव अनंत शुक्ल.

ही नवीन सेन्सेशनल कादंबरी लवकरच प्रसिद्ध होईल.

---

# विक्रीस तयार पुस्तकें

| | |
|---|---|
| संगीत सौभाग्यलक्ष्मी (श्री. स. अ. शुक्लकृत) | रु. १—०—० |
| संगीत देवी अहिल्या (श्री. दि. वि. काशीकरकृत) | ,, १—०—० |
| संगीत वीर विडंबन (श्री. न. चि. केळकरकृत) | ,, १—०—० |
| संगीत भवानी तरवार (श्री. अ. ह. गद्रेकृत) | ,, १—०—० |
| भवानी-तरवार पद्यावली | ,, ०—४—० |
| माझा देश ,, | ,, ०—४—० |

मिळण्याचीं ठिकाणें. { १ चित्रशाळा प्रेस, पुणें शहर. २ यशवंत संगीत मंडळी.

सौभाग्यलक्ष्मी २४४१

D. R. NAGARKAR HOME LIBRARY 378 Shanwar, Poona 2

## समर्पण

जनता—जनार्दना !

भाग्यशाली भारतवर्षाच्या भावी भाग्योत्कर्षा-
साठीं राक्षसी रूढीचे लोखंडी लंगर ताड-
कन् तोडून सुधारणेच्या सरहद्दीवर
समतोल बुद्धीनें सरसावलेल्या, सत्य-
शील-धर्म न्यायादि स्वर्गीय सद्गुण-
सौंदर्याच्या शृंगारसाजानें सज-
लेल्या समाज—स्वरूप सर्वे-
श्वरा ! तुझ्याच महन् मंगल
पवित्र पद-कमलीं ही
कृति सप्रेम सादर
समर्पण असो.

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना

ज्याप्रमाणें परदेशांत असतांना दोन एकमेकांना अगदीं अपरिचित माणसांना मातृभूम्यैक हें एकच कारण परस्परांना आपलेपणा वाटून मदत करण्यास कारणीभूत होतें, मग त्या व्यक्तींमध्यें धर्मभेद, जातिभेद, वयोभेद किंवा व्यवसायभेद कितीही असो, त्याप्रमाणें देशांतल्या देशांत एकमेकांना अगदीं अपरिचित माणसांना आपलेपणा वाटून मदत करण्यास मतैक्य हें एकच कारण पुरें होतें असें वाटतें. निदान माझ्या बाबतींत तरी तें खरें आहे. नाहींतर या नाटकास मला प्रथम विचारल्यापासून एका आठवड्याच्या अवधीच्या आंत मी प्रस्तावना लिहिण्यास लेखणी हातीं धरली या कोड्याचा उलगडा होणें शक्य नाहीं. कारण या नाटकाचे कर्ते रा. शुक्ल हे काळे कीं गोरे हेंही मी पाहिलें नाहीं. प्रचलित मराठी वाङ्मयाशीं परिचय करून घेण्यास मला सवड नसल्यामुळें रा. शुक्ल हे अलीकडे वाङ्मयसेवा करीत असूनही एका आठवड्यापूर्वीं मला त्यांचें नांवसुद्धां ठाऊक नव्हतें. इतक्या अपरिचित लेखकाच्या नाटकास मध्यस्थाच्या सांगीवरून व लेखकाच्या विनंतीवरून मी या नाटकास प्रस्तावनारूप चार शब्द लिहिण्याचें मनांत आणिलें याचें कारण विधवाविवाह या विषयाविषयींचें नाटककाराचें व माझें मतैक्य !

'सौभाग्य-लक्ष्मी' हें नाटक लेखकाचें पहिलेंच स्वतंत्र नाटक असून तें विधवा विवाहाला जनमन अनुकूल करून घेण्याच्या बुद्धीनें लिहिलेलें आहे.

रा. गडकऱ्यांच्या पहिल्या विधवाविवाहविषयक नाटकास मी प्रस्तावना लिहिली होती व आज त्याच विषयावरील रा. शुक्ल यांच्या नाटकास ही मी प्रस्तावना लिहीत आहे हा योगायोग विलक्षण आहे. रा. गडकऱ्यांच्या नाटकाप्रमाणें रा. शुक्ल यांचें हें 'सौभाग्य-लक्ष्मी' नाटकही लोकप्रिय होवो अशी आशा करून नाटकाविषयीं व तदन्तर्गत विषयाविषयीं मी आपले विचार वाचकांना सादर करण्याचें धाडस करतों.

'सौभाग्य-लक्ष्मी' हें तीन अंकीं लहान नाटिकावजा सामाजिक नाटक आहे. नाटकाच्या हेतुला साजेल अशाच तऱ्हेची संविधानकाची रचना आहे. स्थळ,



काळ व संविधानकांतील स्त्रीपुरुष हीं 'आजकालचीं' आहेत. मुंबई व मुंबईच्या जवळचें एक गांव हें स्थळ आहे. नाटकाचा काळ हल्लींचाच आहे. त्याचा अवधि महिना पंधरा दिवसांतलाच आहे. सुशिक्षित हिंदु पांढरपेशा वर्गांतील पात्रें कल्पिलेलीं आहेत. पांच सहा बायका व पांच सहा पुरुष इतकींच फक्त नाटकांत पात्रें असल्यामुळें संविधानक साधें व सहज समजण्यासारखें आहे. त्यांत गुंतागुंत किंवा ओढून ताणून आणलेले प्रसंग मुळींचे नाहींसे.

विमला—या नाटकांतील नायिका—ही एक बालविधवा आहे. हिच्या लग्नानंतर एकाच वर्षाच्या आंत हिचे आईबाप व नवरा वारले व म्हणून विमला ही अगदीं निराधार होऊन तिला आपल्या भावासह आपल्या विधवा सासूवर सर्वस्वीं अवलंबून रहावें लागलें. विमलेची सासू भीमाबाई ही पुष्कळ श्रीमंत आहे. तिला श्यामसुंदर नांवाचा, परीक्षेच्या वाऱ्या करून थकलेला पण ऐटबाज व उनाड असा भाचा आहे. हाच या नाटकांतला दुष्ट मनुष्य आहे. भीमामावशी ही धर्मवेडी, भोळसर, निर्दय, श्रीमंतीनें फुगलेली अशी म्हातारी आहे व श्यामसुंदरच्या चिथावणीनें ती विमलेचा अमानुषपणें छळ करते. असा छळ करविण्यांत शामसुंदरचा दुहेरी दुष्ट हेतु; एक विमलेला भ्रष्ट करण्याच्या प्रयत्नांत आपल्याला आलेल्या अपयशाचा तिच्यावर सूड उगवावयाचा व दुसरा अशा छळानें तरी ती आपल्याला वश होईल ही अंधुक आशा ! विमलेची शेजारीण वारुताई फार दयाळू होती. ती विमलेला व दीनानाथाला होईल तितकी मदत करी व त्यांचें दुःख हलकें करण्याच्या प्रयत्न करी. तिचा भाऊ नरेंद्र हा नेहमीं बहिणीकडे येत असे; शिवाय विमलेची त्याला बालपणापासून माहिती असे व तिच्याबद्दल त्याला फार सहानुभूति वाटे; व यामुळें आपल्या समाजांतील विधवांच्या दुःस्थितीबद्दल त्याच्या मनांत सारखे विचार घोळत व आपण त्यांची दुःस्थिति नाहींशी करण्यास कांहीं तरी करावें असें त्याच्या मनांत येत असे. तो मेडिकल कॉलेजांत होता व तेथें त्याचा सरोजिनी नांवाच्या एका सुस्थितींतिल गृहस्थाच्या—कर्त्या सुधारकाच्या—एकुलत्या एक मुलीशीं मैत्री जमली होती. तीही मेडिकल कॉलेजांत होती. त्यांच्या एम. बी. बी. एस. च्या परीक्षेच्या निकालाच्या दिवशींच नाटकाला प्रारंभ झालेला आहे. दोघेजणही हुषार विद्यार्थ्यांपैकीं असल्यामुळें त्यांना परीक्षेच्या निकालाबद्दल खरोखरी धाकधुक वाटत नाहीं. यामुळें तीं प्रेमानंदाच्या भरांत थट्टामस्करी करीत बसलीं असतांना टेलीफोन मधून दोघेजणही फर्स्टक्लासांत पास झाल्याबद्दल कोर्टांतून नानासाहेब (सरोजिनीचे वडील)

यांचेकडून बातमी कळते. अर्थात् दोघांनाही परमानंद होतो. पण दोघांनाही भावी आयुष्याबद्दल व त्यांतील कर्तव्यकर्माबद्दल चिंता उत्पन्न होते. नरेंद्रांच्या मनांत सरोजिनीबद्दल प्रेम व विमलेबद्दल सहानुभूति व तदनुषंगिक विधवांची दुःस्थिती दूर करण्याबद्दलची कर्तव्यबुद्धि अशाभावना एकसमयावच्छेदेंकरून उधृत झालेल्या त्याला आढळून येतात. इतक्यांत त्याला श्रीयुत–एक कविब्रू–भेटतो व त्याच्या कवितेच्या बाडांतून सहज गळून पडलेलें, श्यामसुंदरच्या दुष्ट वृत्ति स्पष्ट दाखविणारें, श्यामसुंदरचेंच एक पत्र त्याला मिळतें. अशा रीतीनें सहजच त्या श्रीयुताच्या अजाणपणाचा फायदा नरेंद्राला मिळून तो विमलेवरची आपत्ती टाळण्यासाठीं नंदापूराला तत्काळ निघून जातो. श्यामसुंदरचें विमलेला विद्रूप करण्याचे वगैरे सर्व बेत ढासळून पाडतो व विमलेला मुंबईला आणून विधवाश्रमांत ठेवण्याचें ठरवून त्याप्रमाणें तो व्यवस्था करतो.

श्यामसुंदराला हें समजतांच तो, सवंग लोकप्रियतेची अनिवार हांव असलेल्या आपल्या मेहुण्याची, श्रीयुताची गांठ घेतो आणि त्याच्याकडून दोन आचरट प्रेमविषयक कविता मिळवितो. नंतर त्या कविता व दुसरीं बनावट पत्रें विमलेच्या दुर्वर्तनाचा पुरावा म्हणून शाळेच्या मुख्य मास्तरिणीकडे पाठवून नरेंद्राचा डाव हाणून पाडण्याचा तो प्रयत्न करतो. पण त्यांतही त्याला अपयश येतें.

नरेंद्राचें प्रेम द्विधा झालेलें आहे हें सरोजिनीच्या ध्यानांत आल्यापासून आपल्या प्रेमाचा होम करून विमलेचा व नरेंद्राचा विवाह घडवून आणण्याचा ती निश्चय करिते व आपल्या डॉक्टरी ज्ञानाचा, अविवाहित राहून सर्व समाजाला लाभ करून देण्याची स्वार्थत्यागी बुद्धि धरते. व एक मोफत रुग्णालय चालविण्याचा विचार करिते. सरोजिनी मग नरेंद्राचें मन या गोष्टीला वळवितें व तोही विमलेचें मन वळवितो. मध्यंतरीं श्यामसुंदर मावशीबाईंना पांच सात हजार रुपये बरोबर घेऊन काशीयात्रेस निघण्याची सल्ला देतो आणि त्याप्रमाणें तिला घरून घेऊन येऊन मुंबईत सोडून पैसे घेऊन पसार होतो, पळतो. या आपत्तीमुळें मावशीबाईंचे डोळे उघडतात व तीही मग विमलेच्या पुनर्विवाहास परवानगी देते. श्यामसुंदरलाही केल्या कर्माचा पश्चात्ताप होतो. यामुळें सर्वत्र आनंदीआनंदांत नाटकाचा शेवट होतो. प्रत्येक नाटकांत विनोदी पात्रें घालण्याचा प्रघात अलीकडें पडला आहे. तदनुरूप श्रीयुत व कांता या कविकवयित्रीचें एक जोडपें या नाटकांत कल्पिलें आहे पण त्याचा मुख्य संविधानकाशीं फारसा संबंध येत नाहीं असें वरील संविधानकाच्या संक्षेपावरून ध्यानांत येईल.



येणेंप्रमाणें नाटकाचें संविधानक आहे. नाटककाराचा उद्देश बालविधवांबद्दल समाजांत सहानुभूति उत्पन्न करून त्यांची स्थिति सुधारण्याचा एक मार्ग म्हणजे त्यांना पुनर्विवाहाची परवानगी देणें हा होय हें दर्शविण्याचा आहे व या नाटकाच्या वाचनानें व प्रयोगानें तो उद्देश बऱ्याच अंशानें सिद्धीस जाईल यांत शंका नाहीं. विमलेच्या अमानुष छळाबद्दल कोणत्या सहृदय मनुष्याला राग येणार नाहीं ? नाटककारानें वर्णन केलेली स्थिति थोडीशी अतिशयोक्तीनें भरलेली असेल. चित्र कांहीं भडक रंगांत रंगविलें असेल, पण आमच्या समाजांत बालविधवांचा थोडा फार छळ चालू नाहीं, त्यांच्या असहाय स्थितीचा फायदा घेऊन त्यांना दुर्वर्तनी बनविण्याचा श्यामसुंदरसारख्या माणसाकडून प्रयत्न होत नाहीं व आमच्या समाजाच्या आहेत त्या चालीरीती समाधानकारकच आहेत असें कोणता समंजस व सहृदय मनुष्य म्हणेल ? समाजाचें ज्याप्रमाणें इतर चालीरीतींच्या बाबतींत स्थित्यंतर होत आहे, त्याप्रमाणें पुनर्विवाहाच्या बाबतींत होणें रास्त नाहीं काय ? नवीन बदललेल्या परिस्थितींत जुन्या चालीरीतींनांच आपण चिकटून बसलों तर त्यापासून नवीन नवीन अनर्थ उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहींत. समाजांत हल्लीं स्त्रीशिक्षणाचा प्रसार होत चालला आहे. बालविवाहाचा प्रघात कमी होत चालला आहे. स्त्रीपुरुषांच्या संमेलनांचे प्रसंग वाढत आहेत. समाजांत व्यवहारिक वाङ्मयाचा प्रसार होत चालला आहे. समाजांतील व्यक्तींना थोडेफार स्वातंत्र्य मिळत चाललें आहे. अशा परिस्थितींत जुलुमानें व सक्तीनें विधवांचे बाबतींत पूर्वींच्या विवाहप्रतिबंधाचा निर्बंध चालू ठेवल्यास त्यापासून स्वैराचार व अनीति वाढल्याखेरीज राहणार नाहींत. शिवाय प्रत्येक माणसाला जगांत येऊन सुखानें व नीतीनें आयुष्य-क्रमण करण्याचा अधिकार आहे असें मत फैलावत चाललें आहे. मग हा न्याय विधवांना लागू नाहीं काय ? तेव्हां या विषयासंबंधीं लोकजागृती करणें अवश्यक आहे. व रा. शुक्ल यांचा प्रयत्न योग्य दिशेनें होत आहे यांत शंका नाहीं !

नाटकावरून न कळत मी नाट्यविषयाकडें वळलों. पण आतां आवरतें घेतलें पाहिजे. रा. शुक्ल यांचें नाटक वाचून माझ्या मनावर एकंदरींत अनुकूल परिणाम झाला, तसाच तो प्रेक्षकवर्गावर होईल अशी मला आशा आहे.

रा. शुक्ल यांचें विमलेचें चित्र करुणरसपूर्ण उतरलें आहे खास. तिचें बंधुप्रेम, तिचा सोशिकपणा, तिचें नीतिधैर्य वगैरे गुण आर्यस्त्रीला साजेसे नाहींत

असें कोण म्हणेल ? सरोजिनीचें चित्रही उदास आहे. हल्लींच्या काळीं नरेंद्रासारखी परिस्थिति पुष्कळांची असते. त्यांत धोपट मार्गानें न जातां नवा सुधारणेचा मार्ग काढणारे नरेंद्रासारखे तरुण पुढें येणें अवश्यक आहे.

रा. शुक्ल यांची या नाटकांतील भाषा-शैली गडकरी पंथाची आहे, येवढें सांगितलें म्हणजे तिची सहज कल्पना करतां येईल. या नाटकांतील पद्येंही साधी व प्रसादयुक्त आहेत, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. आतां, तीं गातांना कशी काय वठतात हें प्रयोग पाहिल्याखेरीज सांगणें कठिण आहे.

झालें; प्रस्तावनेची मर्यादा संपली. तेव्हां रा. शुक्ल यांचें हें पहिलें सामाजिक नाटक चिरंजीव होवो, असा आशीर्वाद देऊन लेखणी खालीं ठेवतों.

विलिंग्डन कॉलेज, जिल्हा सातारा. } गोविंद चिमणाजी भाटे
ता. १५।४।१९२५

## प्रकाशकाचे चार शब्द

रा० सदाशिव अनंत शुक्ल उर्फ 'कुमुद–बांधव' यांचा, एक प्रतिभाशाली कवि, या नात्यानें महाराष्ट्र रसिकवृंदास परिचय आहेच. परंतु एक उत्तम नाटककार या नात्यानें त्यांचा या पुस्तकाच्याद्वारें वाचकांस प्रथम परिचय करून देण्याची सुसंधि मला मिळाली याबद्दल आनंद वाटतो.

या पुस्तकांतील फोटो मुंबईचे सुप्रसिद्ध फोटोग्राफर रा. बी. बी मयेकर यांनीं मुद्दाम पुण्यास येऊन काढून दिले, मनोरंजन प्रेसच्या चालकांनीं त्यांचे उत्तम ब्लॉक करून छापून दिलें व चित्रशाळेचे मालक रा. वासुदेवराव जोशी व मॅनेजर रा. शंकरराव जोशी यांनीं अल्प अवकाशांत छपाईचें काम अत्यंत काळजीपूर्वक सुबक करून दिलें याबद्दल वरील सर्वत्रांचा मी फार आभारी आहे.

कांहीं अनपेक्षित अडचणीमुळें पुस्तक पहिल्या प्रयोगाचे वेळीं वाचकांचे हातीं पडलें नाहीं याबद्दल दिलगीर आहे.

सर्वांचा नम्र,
शंकर रामचंद्र सरनाईक.

22 APR 1925
G. M. Deshmukh
D. R. NAGARKAR, ADV. HOME LIBRARY 378 Shanwar, Poona 2

# सौभाग्य–लक्ष्मी

## प्रवेश पहिला

[ शृंगारलेला भव्य दिवाणखाना–मध्यभागीं सुंदर टेबल–त्यावर एक फ्लावरपॉट–एका बाजूला सरोजिनी दिलरुब्यावर पुढील पद म्हणत बसली आहे–पद चालू असतां नरेंद्र येतो— बाजूच्या टेबलावर टोपी काठी ठेवून ऐकत तिच्या मागें उभा राहतो.]

### नांदी पद १

अभिराम प्रभु–नाम–धर प्रेम–परब्रम्ह ! नमन निष्काम त्या महोदारा ॥ ध्रु० ॥ देश परमेश सम, हा दया धर्म मम, सुमंगल धाम बल आत्मोद्धारा. ॥ १ ॥ लोक–हित–रत सुमन हे करित सुमन–गुण निजार्पण जाण तुज विश्वाधारा ! ॥ २ ॥

नरेंद्रः—[ पद झाल्यावर फ्लावरपॉटमधील फुलें तिच्यावर उधळून ] अहाहा ! रंगदेवता प्रसन्न आहे ! झालं इतकं ईशस्तवन बस्स आहे.

सरोजिनीः—[ दचकून उठून ] कोण ? नरेंद्र ? मी केवढ्यांदा दचकलें बाई ! काव्यदेवीच्या क्रीडोद्यानांत कल्पनेशीं खेळून खेळून कंटाळा आला म्हणून वाटतं कविराजांनीं करमणुकीसाठीं यावेळीं इकडं येणं केलं ?

नरेंद्रः—छे–छे–तसं नव्हे तर या काव्याच्या प्रत्यक्ष प्रतिमेची प्रेमपुष्पांनीं अशी पूजा बांधण्यासाठींच अस्मादिकांची स्वारी इकडं आली आहे. सरोजिनी, देवि, करा–या भोळ्याभाबड्या भक्ताच्या पूजेचा स्वीकार करा.

सरोजिनीः—अस्सं–अस्सं–एकूण आज अशा महापूजेचा समारंभ साजरा करणार वाटतं ? पण प्रेमाच्या साम्राज्यांत हा बाई कुठला उलटा न्याय !